पांढरी साठवण तलाव, ता. आष्टी, जि. बीड योजनेस, व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा १०१२/(५५/२०१२)/ ल.पा.१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ३० मे, २०१५

**वाचा**

१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे जा.क्र.मकृखेविम/२०९/(७९३/२००९)/लपा३/९६४, दि.०७/०२/२०१२ चे पत्र.

२) वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांचे पत्र क्रं. व्ययस- २०१५/प्रक्रं११३/अर्थसं-२, दि.६ मे,२०१५

**प्रस्तावना**

पांढरी साठवण तलाव, ता. आष्टी, जि. बीड या योजनेस दिनांक १३.०३.२०११ अन्वये रु.४९२.१७४ लक्ष इतक्या रकमेस प्रथम प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली होती. सदर अंदाजपत्रक २००७-०८ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले होते.प्रकल्पाचे काम सुरु असतांना दरसूचीच्या दरातील वाढ, भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ, संकल्पचित्रातील बदलांमुळे व इतर कारणांमुळे (निविदा अधिक्य इ.) किंमतीत झालेल्या वाढीमुळे सन २०१०-११ ची दरसुची वापरुन सुधारित अंदाजपत्रक तयार करुन रु.७०१.३७ लक्ष रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे कडून शासनास प्राप्त झाला होता व तो शासनाच्या विचाराधिन होता. सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

१) बीड जिल्ह्यातील लपात, पांढरी साठवण तलाव या योजनेस या योजनेस सन २०१०-११ ची दरसूचीवर आधारित केलेल्या सुधारित प्राक्कलनानुसार कामाच्या अंदाजित रु . ७०१.३७ लक्ष (रुपये सात कोटी एक लाख सदतीस हजार फक्त )या किंमतीस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी कामासाठीची एकूण तरतूद रु.६४७.२८ लक्ष (रुपये सहा कोटी सतेचाळीस लाख अठठवीस हजार फक्त) व अनुषंगिक खर्चासाठीची एकूण तरतूद रु५४.०९ लक्ष (चोप्पन्न लाख नऊ हजार फक्त) आहे. अंदाजित किंमतीचा गोषवारा सोबत जोडलेल्या विवरणपत्रात देण्यात आला आहे.

२) व्यय अग्रक्रम समितीच्या दि.९ एप्रिल २०१५ रोजी झालेल्या बैठकीत सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे व हा निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३) या योजनेच्या कामावरील खर्च मुख्य लेखाशिर्ष मागणी आय ५ "४७०२, लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च-१९०, सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमा यांतील गुंतवणुका (१२)(०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (मराठवाडा विभाग) (४७०२ ७६२१) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व मंजूर अनुदानातुन भागविण्यांत यावा.

४) हा शासन निर्णय,नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२२७/का.१४३४ दि. १७/०८/२०१३ आणि वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. १५०/व्यय १२ दि.११/०३/२०१४ अन्वये तसेच व्यय अग्रक्रम समीतीने दि. ९ एप्रिल २०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या मंजूरीनुसार व संदर्भ क्रं २ नुसार याबाबतच्या निर्गमीत केलेल्या इतिवृत्तानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

५) या योजनेस प्रदान केलेली सुधारित प्रशासकीय मान्यता अ.क्र. ९८/२०१५ वर नोंदविण्यांत आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६०३१२३५०९८१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Baburao Kshirsagar

Digitally signed by Rajendra Baburao Kshirsagar
DN: CN = Rajendra Baburao Kshirsagar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2015.06.03 12:35:54 +05'30'

**(रा. बा. क्षीरसागर)**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत,**

१) अंदाजित किंमतीच्या गोषवाऱ्यासह :-
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपुर.
४) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
५) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे.
६) आंतर वित्त सल्लागार व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) जिल्हाधिकारी बीड, बीड.
८) अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद.
९) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
१०) उपसचिव (लपा)/ अवरसचिव(लपा) /उपअभियंता(लपा-१), जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई.
११) कार्यासन अर्थ १-२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क, महासंचालक, मंत्रालय, मुंबई.

(शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. सुप्रमा १०११/(४६३/२०११) ल.पा.१, दि. ३० मे २०१५ चे सहपत्र)

## विवरण पत्र

पांढरी साठवण तलाव, ता. आष्टी, जि. बीड अंदाजित किंमतीचा गोषवारा

| अ.क्र. | उपशिर्ष | किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|
| | अ - प्राथमिक कामे | ०.६७ |
| | ब - भू संपादन | १०६.३५ |
| | सी - कामे | ५१८.०६ |
| | डी- विमोचक | १६.६३ |
| | के- इमारत | १.० |
| | ओ संकीर्ण | ०.५० |
| | पी देखभाल | ०.५० |
| | आर दळणवळण | ३.५७ |
| | अनुषंगिक खर्च | ५४.०९ |
| | **एकूण** | **७०१.३७** |

## ठळक वैशिष्टे

१. योजनेची सिंचन क्षमता - २७८ हेक्टर
२. नियोजित पाणी साठा - १६९७ स.घ.मी.
३. पाणी साठ्याची प्रती स.घ.मी किंमत - रु. ४१३३३/-स.घ.मी.
४. लाभव्यय गुणोत्तर - ०.९५